मे.कौन्सिल सभा क्र.१७
सर्वसाधारण सभा

नगरपरिषद कार्यालय,इचलकरंजी
दि.१६/२/२०१८.

## :: सभेची नोटीस ::

याव्दारे इचलकरंजी नगरपरिषदेचे सभासद,मा.
यांना नोटीस देणेत येते की, इचलकरंजी नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा सोमवार दि.२६/२/२०१८ इ.रोजी दुपारी १२.१५ वाजता गट नंबर १०७ मधील नगरपरिषद नविन प्रशासकीय इमारतीमधील सभागृहात भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणांस विनंती करणेत येत आहे.

सही /-
अध्यक्षा
इचलकरंजी नगरपरिषद

***********************************************************************

## :: परिशिष्ट ::

विषय क्र.१: नगरपरिषदेचे सन २०१७/२०१८ चे दुरुस्त व सन २०१८/२०१९ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी मे.स्थायी समितीने ठ.क्र.११६/दि.१२/१/२०१८ नुसार केले शिफारशीचा विचार करणे.

विषय क्र.२:खालिल कामांची अंदाजपत्रके मंजुर करणेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावांचा विचार करणे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | सी.ई.टी.पी. ते जैन मंदिर, बोहरा मार्केट पर्यंत रस्ता डांबरीकरण मजबुतीकरण करणे. | २२,९७,३७०/- |
| २ | प्र.क्र.१६ सांगली नाका पाण्याची टाकी लगत भाजी मंडई करीता पेव्हींग ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे. | ६,६१,०३०/- |
| ३ | वेदभवन येथे कट्ट्याची दुरुस्ती करणे व फरशी बसविणे. | ६,२६,८९०/- |

विषय क्र.३:न.प.च्या विकास कामांची गुणवत्ता / दर्जा चांगला रहावा तसेच विकास कामांचा लाभ नागरिकांना दिर्घकाळ होवून देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी व्हावा या हेतूने विकास कामांवर नियंत्रणासाठी बांधकां पर्यवेक्षक सेवा उपलब्ध करणे (वार्षिक खर्च रु.६,८८,३२०/-) कामी मागविणेत आलेल्या निविदांपैकी सर्वात कमीची म्हणजे शे.०.५०% कमी दराची मक्तेदार किसन यादव यांची निविदा मंजूरीकामी कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र.४:प्र.क्र.१२ आंबेडकर नगर गल्ली नं.५,६,७ व परिसरामध्ये स्ट्रीट लाईट सोय करणे (अंदाजपत्रक रु.८,७४,६२४/-) कामी मागविणेत आलेल्या निविदांपैकी सर्वात कमीची म्हणजे शे.४.९०% जादा दराची मक्तेदार तुषार इलेक्ट्रीकल्स यांची निविदा मंजूरीकामी कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र.५:न.प.च्या खालिल जागा भाडेतत्वावर देणेकामी मागविणेत आलेल्या निविदांमधिल खालिल निविदारधारक यांच्या निविदा मंजूरीकामी कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

| अ.क्र. | ठिकाण | निविदाधारक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ऑफीस कम भाजी मार्केट इमारत रि.स.नं.९३३९ ते ९३४८ तळ मजला खोली क्र.१ | मनोज अ.सोनवले | १,८०,०००/- |
| २ | स्टेशन रोड जकात नाका इमारत गट नं.४५ | सुशांत ट्रान्सपोर्ट प्रोप्रा.सुशांत खरात | ५०,०००/- |

विषय क्र.६:अध्यक्ष डी.वाय.माने एज्युकेशन ॲण्ड चॅरिटेबल सोसायटी, इचलकरंजी यांनी साईट नं.७१ इमारतीमधिल तिसरा मजला (जुनी शिक्षण मंडळ इमारत) येथील रिकाम्या असणा-या खोल्या भाडेतत्वावर मागणी केलेकामी कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र.७:सर्वसाधारण रस्ता अनुदान अंतर्गत प्राप्त रु.६५ लाख निधीतून प्रस्तावात नमूद १ ते ५ कामे करणेस व उर्वरीत शिल्लक रक्कम न.प.फंडातून खर्च करणेस मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र.८:समाज प्रबोधनासाठी सहाय्यभुत ठरणारे फायबर कास्टींगचे क्रिएटीव्ह स्टॅचू न.प.प्रशासकीय इमारतीमध्ये उभारणेस व सदर कामाचे अंदाजपत्रक रु.६,४२,८००/- यास मंजूरी देणेबाबत कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र.९:इचलकरंजी नगरपरिषदेस वैशिष्ठ्यपूर्ण योजनेअंतर्गत सन २०११/२०१२ सालातील अखर्चित र.रु.१०० लक्ष व सन २०१३/२०१४ सालातील र.रु.२४ लक्ष शासनाकडे जमा करणेस मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र.१०:प्रकाश यशवंत मगदूम, सेवानिवृत्त मुकादम यांचे सेवाकालावधितील ९५३ दिवस गैरहजर कालावधी असाधारण रजेत परावर्तीत करणे मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र.११:इचलकरंजी नगरपरिषद व दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्यु.सोसायटी यांचे भागिदारी तत्वाने क्रांती प्रशिक्षण व वस्त्र प्रावरणे प्रकल्पांतर्गत वापरात असणा-या मशिनरी व फर्निचर जाहीर लिलावाने विक्री करणे किंवा मशिनरींसह प्रकल्प चालविणेस देणे याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी कौ.ठ.नं.१७९/दि.१९/९/२०१७ नुसार पुढील मिटींग समोर ठेवणेबाबत झाले निर्णयाचा विचार करणे.

Scanned by CamScanner

विषय क्र.१२: खालिल कामांची अंतिम देयके आदा करणेबाबत आलेल्या शिफारशी तसेच कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावांचा विचार करणे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मक्तेदार | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्रीमंत ना.बा.घोरपडे नाट्यगृहाकडील ट्रान्स्फॉर्मर वायर्डींग, एलटी केबल बदलणे, अग्निशमन सिलेंडर व आर्थिंग सुरक्षेबाबतची कामे करणे. (सदर कामी झालेला जादा खर्च रु.९,२८७/- यासही मंजूरी देणे.) | गडगे इले. | फा.बि. ३,००,५२५/-<br>देय रु. ४९४/- |
| २ | श्रीमंत ना.बा.घोरपडे नाट्यगृहामधिल जुन्या खुर्च्या काढणे, स्टोअरकडे जमा करणे व नविन बसविणे. | गडगे इले. | फा.बि. ४,८३,१२०/-<br>देय रु. २,५५५/- |

विषय क्र.१३: खालिल कामी मा.अध्यक्षसो यांनी दिले आदेशांना कार्योत्तर मंजूरी देणेबाबत कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावांचा विचार करणे.

| अ.क्र. | कामाचे नाव | तारिख |
|---|---|---|
| १ | स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मोहीमे अंतर्गत प्रसार व प्रचार करणेसाठी भित्तीपत्रके, पोष्टर्स, शालेय विद्यार्थ्यांसाठी माहीती वजा पोष्टर्स वार्षिक मंजूर दरात मंजूर मक्तेदार यांचेकडून काम करुन घेणेस. | ६/१२/२०१७ |

विषय क्र.१४:मा.अध्यक्षसो यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे इतर विषय.

*************************************************************************

## :: टिप्पणी ::

विषय क्र.१:म.न.प.अधि.१९६५ चे कलम १०१ (४) प्रमाणे अंदाजपत्रकाचा निर्णय दि.२८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी होणेस हरकत नाही.
विषय क्र.२: (१ ते ३) प्रस्तावाप्रमाणे अंदाजपत्रके मंजूर करणेस हरकत नाही.
विषय क्र.३:वरीलप्रमाणे निविदा मंजूरीसाठी मे.कौन्सिलकडे शिफारस करणेत येत आहे.
विषय क्र.४:वरीलप्रमाणे मंजूरीसाठी प्रस्ताव मे.कौन्सिलकडे शिफारस करणेत येत आहे.
विषय क्र.५: (१ ते २) वरीलप्रमाणे मंजूरीसाठी प्रस्ताव मे.कौन्सिलकडे शिफारस करणेत येत आहे.
विषय क्र.६:मे.कौन्सिलमध्ये विचारविनिमय होवून धोरणात्मक निर्णय होणेस हरकत नाही.
विषय क्र.७:रिपोर्टप्रमाणे मंजूर करणेस हरकत नाही.
विषय क्र.८:अहवालाप्रमाणे मंजूरी मिळणेस हरकत नाही.
विषय क्र.९:प्रस्तावाप्रमाणे अखर्चित अनुदान रक्कम शासनाकडे जमा करणेस मान्यता मिळावी.
विषय क्र.१०: ९५३ दिवस गैरहजेरीचे रजेत रुपांतरीत करणेस मान्यता मिळावी.
विषय क्र.११:मे.कौन्सिलमध्ये विचारविनिमय होवून धोरणात्मक निर्णय होणेस हरकत नाही.
विषय क्र.१२:(१ ते २) सदरचे बिलास बजेट मध्ये तरतुद असलेने व ते लेखापरिक्षक यांनी तपासले असुन ते बरोबर असलेने बिलास व उर्वरीत रक्कम आदा करणेस शिफारस करणेस हरकत नाही.
विषय क्र.१३:मा.अध्यक्षसो यांनी दिले आदेशास कार्योत्तर मंजूरी मिळणेस हरकत नाही.
विषय क्र.१४: ऐनवेळच्या विषयामध्ये ५ पेक्षा जादा विषय तसेच आर्थिक व धोरणात्मक विषय घेता येणार नाहीत.

सही /-
मुख्यअधिकारी
इचलकरंजी नगरपरिषद

खरी नक्कल
सेक्रेटरी
इचलकरंजी नगरपरिषद

Scanned by CamScanner